" आपलें मंडळ "

|| Maharashtra Mandal of Detroit ||

Est. 1977

महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट

एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ

# स्नेहबंध





## संक्रांत

### विशेषांक

तिळगूळ
घ्या
गोड-गोड
बोला !



फेब्रुवारी २०२६

# The Future of Coatings








- 2K Monocoat
- 2K Base/Clear
- 1K Waterbase
- 2K Waterbase
- One-Coat over TPO/PP
- Adhesion Promoters
- Laser-Etchable Coatings
- Soft-Touch Coatings
- Chrome-Look Coatings
- In-Mold Coatings
- Hydrographics Clearcoats
- Metallic Coating Finishes
- Non-Metallic Coating Finishes
- Much Much More



- Known in the Industry for Unsurpassed Technical Capabilities
- Leader in Metallic Paint Development for Auto Interiors
- Rapid Product Development with Custom Formulations to Meet market and Customer Specific Requirements

Global Headquarters
15169, Northville Rd, Plymouth, MI 48170
734-420-0101
www.dhakeindustries.com

# अनुक्रमणिका


| अनु.क्र. | लेख / कविता - नाव | लेखक / कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | अध्यक्षीय | Mansi Dahanukar | ४ |
| २ | संक्रांतीच्या निमित्ताने! | ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर | ६ |
| ३ | ययाति | सौ नम्रता औंधकर | ८ |
| ४ | द्वैतातील अद्वैत ( भारूड ) | अरुणा मुल्हेरकर | १० |
| ५ | आरोग्यम् धनसंपदा | अंजू वळे | ११ |
| ६ | Our Place in the Universe | Devesh Pande | १५ |
| ७ | खोबऱ्याचे अनारसे ( Recipe) | गायत्री येवला | २३ |
| ८ | लेट देम | सायली चिमणपुरे कुलकर्णी | २४ |
| ९ | डब्बेच डब्बे चोहीकडे ग बाई | वीणा शाह | २८ |
| १० | मराठी चित्रपट २०२५ - माझ्या नजरेतून | अमित गाडगीळ | ३१ |
| ११ | Youth in the heart of Our Mandal | Pratyush Neelekanthan | ३४ |
| १२ | आजी आजोबा पारंपारिक की आधुनिक | प्राची चितळे | ३६ |
| १३ | Ode to the Volunteers of MMD | Uday Pathre | ३८ |
| १४ | आठवणींच्या हिंदोळ्यात | प्रमिलाताई सरदेशपांडे | ४१ |
| १५ | एक दुरावा | राजन (निरंजन) | ४३ |
| १६ | Canton Marathi Shala | Various Artists | ४५ |
| १७ | Troy Marathi Shala | Various Artists | ४८ |



**संपादक :**
स्नेहा विपट

**मुखपृष्ठ, रचना व मांडणी**
देवेंद्र चितळे

**स्नेहबंध समिती :**
बागेश्री नाईक प्राची चितळे

**मार्गदर्शन आणि सहाय्य :**
ज्योत्स्ना माईणकर - दिवाडकर वर्षा पाथरे अमित नेवाळकर अमित गाडगीळ



लेखकांना, चित्रकारांना आणि वाचकांना संपूर्ण मतस्वातंत्र्य देण्यात आले आहे. लेखांतून व चित्रांतून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक किंवा आपण सहमत असूच असे नाही, तेंव्हा आपण हा अंक केवळ "मनोरंजनासाठी" आहे अशी अपेक्षा ठेवून वाचावा, ही विनंती!

# अध्यक्षीय

**Happy Makar Sankrant (much belated)!**

What a beautiful way to begin 2026, our first major event in this landmark 50th year of MMD.



As we celebrate five decades of our Mandal, I find myself reflecting not only on MMD's journey, but on the journey within each of us.
Fifty years ago, MMD began as a simple idea, a few families carrying a longing for culture, connection, and belonging. There were no grand plans, only faith and the courage to begin. Over time, that small vision found strength through tireless volunteers, silent donors, generous sponsors, and members who showed up consistently. With every passing year, more hands joined, more dreams took shape, and MMD slowly grew into the vibrant community we cherish today. Each leader along the way has shaped what we are today, and I stand here deeply grateful and committed to doing my very best to honor and do justice to their efforts.



आपण सारे एका छोट्याशा स्वप्नातून मोठ्या प्रवासाला सुरुवात करतो.
As children, we all dream of becoming something big, sometimes even something impossible, if you ask an adult. In those early years, ambition has no limits. But as life moves forward, reality reshapes us. Responsibilities, opportunities, and circumstances guide us in directions we may not have imagined. Yet in that reshaping, we grow, we evolve, and we discover who we are meant to be.
My own journey with MMD mirrors this transformation. I began attending events in 2013, stepped into volunteering in 2016, and after BMM 2017, what began as participation became belonging, this organization became family. न कळत, कार्यक्रमांना उपस्थित राहणं माझ्या स्वतःच्या घडण्याचा एक भाग बनत गेलं.

In 2023, I had the privilege of serving as Vice President alongside Sheetal Sonar, a phenomenal leader who became not just a mentor but a dear friend. Today, as we move forward in 2026, I am grateful to continue this journey with Prajakta Kulkarni, our dynamic Vice President, who elevates every idea and brings love and belonging into all that she does. This journey has taught me that leadership is never individual, it is collective, shaped by the people who walk beside us and the community that believes in us.
MMD at 50 is not just an anniversary, it is the coming together of thousands of personal journeys. Every volunteer hour, every contribution, every shared laugh has built this legacy.
As we step into this milestone year, let us also look ahead with courage. Let us welcome new ideas, break barriers that limit participation, and create a more inclusive space where every voice feels heard and valued. Growth is not only about preserving traditions, but also about evolving with openness and intention.

As we mark this golden milestone, I invite you to reflect on your own path. What did you once dream of becoming? Where has life brought you today? For our Ganpati edition of Snehabandh, please share max 2/3 sentences- (1) your childhood dream (2) and your journey to today (a childhood photo if you wish) at president@mmdet.org.

The story of MMD is still being written. Stay with us through this special year, through the celebrations, the hard work, and the bold new ideas. Together, let us continue adding meaning, purpose, and heart to the next chapter of our journey.

**With gratitude,**
**At your service in 2026 (and Beyond)**
**Mansi Dahanukar**
**Mansi.dahanukar@mmdet.org**



# संक्रांतीच्या निमित्ताने!

नवे वर्ष सुरु झाले की कॅन्टन आणि ट्रॉय मराठी शाळेतील शिक्षकांच्या चर्चेला सुरुवात होते, शाळेत संक्रांत साजरी कशी करायची? मुलांना सुगड-पूजा दाखवायची, वर्गात पतंग करायचे की, तिळगूळ वाटायचा, 'तिळगूळ घ्या गोड गोड बोला' म्हणायचं, मग संक्रांतीची माहिती सांगायची...आणि तिथेच गाडी अडकते. इथे वाढणाऱ्या मुलांना संक्रांतीबद्दल नक्की काय सांगायचं? आपण मात्र गुळपोळी, काळ्या साड्या, हळदीकुंकवाचं वाण, भोगीच्या भाज्या, 'काय पो छे', गच्चीवर जाऊन, गर्दी करून पतंग उडवणं या आठवणींमध्ये गर्क होतो.

हे सगळं मुलांपर्यंत कसं पोहोचायचं?

आधी मुलांना समजतील अशा संकल्पनांपासून सुरुवात करायची. खाणं आणि देणं! तीळ आणि गुळ ह्या पदार्थामुळे उष्णता मिळून थंडीपासून संरक्षण होते. म्हणून जानेवारीत हे घटक असलेले खाद्यपदार्थ केले जातात. तिळगूळ, गुळपोळी व भोगीची भाजी (आपोआप 'ळ' या अक्षराची उजळणी होते!) हे नेहमीचे यशस्वी कलाकार वर्गात हजेरी लावून जातात. हे झालं खाणं.

आता थोडं देण्याविषयी. काही उत्साही शिक्षक सुगड आणतात किंवा घरच्या सुगडाचं चित्र दाखवतात. सुगड (किंवा बोळके), मातीच्या छोट्या मडक्यासारखे. त्यात काय भरायचं? हरभरा, गाजर, ऊसाचे पेरे, तीळ, शेंगदाणे, बोरे, तिळगूळ, हळद, कुंकू, गव्हाच्या ओंब्या, मटार शेंगा, कापूस, कच्ची खिचडी (डाळ आणि तांदूळ)! आणि ते 'वाण' म्हणून द्यायचं.
त्यामुळे डबा किंवा डब्यात भरून काहीतरी द्यायची पद्धत पुढे रुजली. आठवणींचे फडताळ उघडून बघा, चार घरचे डाळ-तांदूळ एकत्र करून आई/आजीने केलेली गरमागरम खिचडी आठवेल तुम्हांला!

कशी ते कळलं हो, पण संक्रांत साजरी का करतात??

"वर्षभरात १२ संक्रांती असतात, त्यातील चार मुख्य असतात. सूर्य धनू राशीतून मकर राशीत प्रवेश करतो ती मकर संक्रांत.."
पण याचा अर्थ काय? सूर्य "मकर राशीत प्रवेश करतो" ही भाषा वैज्ञानिक नाही; ती सांस्कृतिक आहे. आकाशात कुठेही मकर राशीची पाटी लावलेली नाही, आणि भौगोलिक दृष्टीने विचार केला तर सूर्य कुठल्याही सीमारेषा ओलांडत नाही.
मानवाने आकाशाचे भाग केले आणि मग त्या भागांना संस्कृतीनुसार अर्थ चिकटवले.

खरं म्हणजे हा सण निसर्गाच्या बदलाचा आणि पिकांच्या कापणीचा उत्सव असतो. सुगडातून नवीन पिकांचे आणि समृद्धीचे प्रतीक म्हणून वाण दिले जाते. हा सगळा सणाचा सकारात्मक आणि आनंदी भाग आहे.

मुलांना एवढी माहिती पुरते, पण वाचून आपल्याला मात्र प्रश्न पडतो की संक्रांत जर इतका समृद्धीचा आणि आनंदाचा सण आहे तर मराठीत संकट कोसळले तर 'संक्रात आली' असं का म्हणतात? तो संशोधनाचा विषय आहे. एक कारण म्हणजे - म्हणे - १७६१ साली संक्रातीच्या दिवशी पानिपतच्या लढाईत झालेल्या मराठ्यांच्या पराभवामुळे! अपरिमित मनुष्यहानी झाली. त्यामुळे मकरसंक्रातीचा दिवस काळे वस्त्र परिधान करुन साजरा केला जाई . ह्या दिवशी एका मराठी पिढीचे नष्ट होण्याचे संकट ओढल्यामुळे मकरसंक्रातीला 'संकट ओढवणे' असे म्हणत असावेत.

खरं म्हणजे इतका काथ्याकूट करायची गरज आहे का? आपल्याकडील अनेक सण साजरे करण्याचे मुख्य प्रयोजन 'सामाजिक बांधिलकी' हेच असते. मग आपणही शुभ-अशुभ या वादात न पडता एकमेकांशी गोड बोलून ती बांधिलकी मानूया, हो ना!
तिळगूळ घ्या गोड गोड बोला!!

**ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर**



Best Wishes
from
Prabhakar Patil & Family

# ययाति

स्नेहबंध मध्ये लेख लिहिण्याचे विषय वाचले, आणि “आवडत्या कादंबरी विषयी लिहा” हा विषय वाचताच क्षणार्धात “ययाति” ची आठवण झाली. काही पुस्तकं आपल्या आठवणींच्या कपाटात ठेवलेली असतात—धूळ बसावी म्हणून नाही, तर वेळ पडल्यावर पुन्हा उघडावीत म्हणून. खरं सांगायचं तर “ययाति” तशीही विसरता येण्यासारखी कादंबरी नाही. लिहिण्यासारखं खूप काही आहे, हे नक्की; पण नक्की काय लिहावं, हे ठरवण्याआधीच मन म्हणालं, “आधी पुन्हा वाचून पाहूया.” मग Kindle version विकत घेतलं. या आधी अनेकवेळा ययाति वाचलेली ययाति पुन्हा चाळू लागले, मी आता अठरा वीस वर्षांची तरुणी नव्हते, अनेक बरे वाईट अनुभव घेवून – आयुष्याचा मध्य गाठलेली स्त्री, संसाराचे वास्तव जाणून त्रयस्थ भूमिकेतून स्वतःला पाहू शकणारी व्यक्ती आहे .

**न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति।**

**हविषा कृष्णवर्त्मैव भूय एवाभिवर्धते॥**




(अर्थ- वासना या [वस्तूंचा] उपभोग घेतल्याने शांत [नाहीशा] होत नाहीत. तूप घातल्यावर अग्नी जसा वाढतो तशा त्या वाढतात.) कादंबरीचा शेवट या श्लोकाने होतो.

खूप वर्षांनी “ययाति” पुन्हा हातात घेतली तेव्हा जाणवलं—पुस्तक तसंच आहे, शब्द तसेच आहेत, पण अर्थ मात्र नवा उलगडतोय. नवे संदर्भ उमटत होते, तीच पात्रं नव्याने बोलत होती, आणि आपल्या मनाच्या गाभाऱ्यात जे काही गोंधळलेलं असतं, त्याला जणू नीटस आकार मिळत होता. इथेच तर गंमत आहे—कादंबरी बदलत नाही; वाचक बदलतो. आणि वाचक बदलला की तीच ओळ दुसऱ्यांदा वेगळं काहीतरी सांगते. पुन्हा कादंबरी वाचन करणाऱ्याने किंवा नव्या वाचकाने, लेखकाने सविस्तरपणे मांडलेली पार्श्वभूमी वाचूनच कादंबरी वाचावी. हि कादंबरी तरुणांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांसाठी आरसा दाखविणारी आहे.

“ययाति”ची कथा महाभारताच्या **आदिपर्वात**, ययात्युपाख्यानातून आली आहे. हा चंद्रवंशातील राजा प्रतापी, वैभवशाली, ऐहिक सुखांचा उपभोग घेणारा. पण वैभवाबरोबरच एक गोष्ट त्याच्या मागे चिकटलेली असते—अस्वस्थता. शापामुळे ययातिला अकाली वार्धक्य येतं, आणि त्या वार्धक्यापासून सुटका मिळवण्यासाठी तो पुत्रांकडे तारुण्याची याचना करतो. बहुतांश पुत्र मागे सरतात; **पुरू** मात्र पुढे येतो, आपलं तारुण्य देतो, पित्याचं वार्धक्य स्वीकारतो. महाभारतात ही कथा एक स्पष्ट बोध देऊन संपते—उपभोगाला अंत नाही, शेवटी वैराग्यच उरतं. पण वि. स. खांडेकरांनी या कथेला आणि त्यातील पात्रांना स्वतंत्ररीतीने गुंफले आहे , नुसते “नीतिपाठ” म्हणून ठेवलेलं नाही; त्यांनी तिचं रूपांतर **मनाच्या न्यायालयातल्या खटल्यात** केलं आहे. आणि त्यामुळे ययाति केवळ राजा रहात नाही—तो आपल्या काळातला माणूस होतो. खांडेकर इथे घटनांचं वर्णन करत नाहीत; ते माणसाच्या आत चाललेली युद्धं दाखवतात. म्हणूनच “ययाति”ला लाभलेला **ज्ञानपीठ पुरस्कार** हा फक्त कादंबरीच्या बांधणीचा गौरव नसून, विचारांच्या उंचीचा आणि भाषेच्या सुसंस्कृतपणाचा मानदंड आहे. काही पुरस्कार पुस्तकाला मोठं करत नाहीत; पुस्तक आधीच मोठं असतं, पुरस्कार फक्त शिक्का मारतात.

खांडेकरांची हातोटी अशी की ते पात्रं लिहित नाहीत; ते पात्रांच्या मनातल्या प्रवाहांना चालना देतात. ययाति आपल्याला कधी चिडवतो, कधी अस्वस्थ करतो, कधी विचार करायला भाग पाडतो. “हा राजा इतका स्वार्थी कसा?” हा प्रश्न मनात येतो, आणि लगेच

पुढचा प्रश्न टोचतो—“बरं, आपण स्वतः कधी पूर्ण निष्काम असतो का?” ययातिचं दुःख वार्धक्याचं नाही; ते तृष्णेचं आहे ! शरीर थकलं म्हणून तो वैतागलेला नाही; मन थकत नाही म्हणून तो त्रस्त आहे ! मग प्रश्न असा पडतो: मनाचा थकवा येतो तरी कधी? “अजून...” हा शब्द कधी संपतो? आणि जर तो संपतच नाही, तर आपल्याला आयुष्यभर धावतच राहायचं का? इथेच “ययाति” कादंबरी आपल्याला जरा थांबवते. धावणं सोपं असतं; थांबून पाहणं जरा कठीण असतं.

देवयानी आणि शर्मिष्ठा— या कादंबरीतल्या स्त्रिया केवळ कथानकातील व्यक्तिरेखा नाहीत; त्या नात्यांच्या दोन टोकांवर उभ्या असलेल्या भूमिका आहेत. देवयानीचा स्वभाव पाहिला की आपल्याला कधी तिचा राग येतो, कधी तिची कीव वाटते, आणि कधी तिचं दुःखही उमगतं. देवयानीचं प्रेम आक्रमक आहे—तिला प्रेमातही हक्क हवा असतो. ती “माझं” म्हणते, कारण तिच्या आत असुरक्षिततेची एक छोटीशी आग कायम पेटलेली आहे. तिचा अहंकार कोरडा नाही; त्यामागे जखम आहे. शर्मिष्ठा मात्र दुसऱ्या टोकावर—शांत, संयमी, वरवर पाहता गप्प. पण गप्प असणं म्हणजे रिकामं असणं नव्हे, हे कादंबरी फार नीट सांगते. शर्मिष्ठा बोलत नाही, कारण तिच्या वेदनेला शब्द कमी पडतात. तिचा त्याग “मोठेपणा” म्हणून वाचला की तो समजत नाही; तो **एक मनाचा भार** म्हणून वाचला की तो भिडतो. मग प्रश्न असा पडतो—नातं टिकवणं म्हणजे कुणीतरी दरवेळी कमी व्हायचं का? आणि प्रेम म्हणताना अहंकार इतकाच अनिवार्य असतो का?

कादंबरीतील कच आणि यति ही पात्रंही अर्थांच्या खिडक्या आहेत. कच देवयानीच्या भावविश्वाला धक्का देतो; तिच्या अपेक्षांना जखम करतो, आणि त्या जखमेचं रूप पुढे तिच्या स्वभावात उमटत राहतं. यति मात्र वेगळाच सूर—वैराग्याचा, अंतर्मुखतेचा. ययातिच्या आयुष्यात इच्छा नवी नवी रूपं घेत राहते, आणि यति त्या इच्छेला एक प्रश्न विचारतो: “इतकं मिळवून तरी तुला काय मिळालं?” हा प्रश्न खूप साधा आहे, पण धारदार आहे. कारण आपल्याला ‘जास्त’ मिळालं की आपण ‘पुरेसं’ विसरतो. आणि “पुरेसं” कळायला वय लागतं—ही गोष्ट खांडेकर मोठ्या शांतपणे सांगतात.

आजच्या काळात “ययाति” वाचावी का? हा प्रश्न पडतोच. पण खरं तर प्रश्न उलट आहे—आजच्या काळात “ययाति” न वाचता चालेल का? कारण आज आपण वेगवान जगण्यात अडकलो आहोत. इथे ‘अजून’ हा शब्द फार पटकन येतो—अजून प्रगती, अजून पैसा, अजून स्थैर्य, अजून यश... आणि या “अजून”च्या पलीकडे शांतता आहे का, हा प्रश्न आपण आपल्याला फारसा कधी विचारत नाही. “ययाति” तो प्रश्न विचारते. “ययाति” ही मराठी साहित्यपरंपरेतील महान कादंबरी आहे: ती आपल्या इच्छा समजून घेते, पण त्यांना नाचवत नाही; ती आपल्या भावनांना मान देते, पण त्यांना मोकाटही सोडत नाही.

लेख संपवताना “ययाति”ची आठवण फक्त कादंबरीपुरती ठेवावी असं वाटत नाही. अनेक रसिकांच्या मनात कुसुमाग्रजांचं संगीत नाटक **“ययाती आणि देवयानी”** याचंही स्थान आहे. त्या नाटकातील “हे सुरांनो, चंद्र व्हा”, “तम निशेचा सरला”, “प्रेमावरदान स्मर सदा”, “सर्वस्मात्मका, सर्वेश्वरा” यांसारखी गाणी केवळ सूर नाहीत; ती या कथेतल्या भावनांची स्मृती आहेत. शब्द-सूर एकत्र आले की कथेचा अर्थ मनात अधिक खोल बसतो—आणि मग ययाति केवळ राजा रहात नाही; तो आपल्या आतल्या आवाजासारखा होतो. शेवटी इतकंच विचारायचं आहे—ययाति राजा होता, पण त्याचं मन आपल्यासारखंच होतं... मग आपण तरी वेगळे आहोत का? की फरक इतकाच—त्याच्या कथा ग्रंथात आल्या, आणि आपल्या कथा रोजच्या जगण्यात विरून गेल्या?

**सौ नम्रता औंधकर.**



# *द्वैतातील अद्वैत*
## ( भारूड )

इंगळी डसली सर्वांगाला
दाह होतुया भारी
शांतवाया तू इठुराया
धाव घेई सत्वरी.....
चंदनाची चोळी ल्याली
जाळीतसे अंग
धाव पाव गे माझे आई
मुखी पांडुरंग.....
भवाब्धीमधी खोल बुडाले
नौका डळमळते
तारणार तू एकचि आहे
तुझाच धावा करते.....
रूप साजिरे भक्तवत्सला
डोळाभरू पाहू
तव चरणाशी आले माउली
मम देहा वाहू.....
मिटले डोळे नाम मुखी तव
चराचरी दिसशी
द्वैतापासून अद्वैताशी
तूच मजसी नेशी.....
षड्रिपू सारे सोडुनी गेले
देहाभिमान गळला
अंतर्यामी तू भगवंता
माझ्या येउनी वसला.....

**अरुणा मुल्हेरकर**


A J DESMOND & SONS
FUNERAL DIRECTORS

Trusted experts
creating custom goodbyes
reflecting love and life.

AJDesmond.com

TROY • CROOKS ROAD
between Maple & Big Beaver
248.362.2500

ROYAL OAK / BIRMINGHAM
WOODWARD AVENUE
between 13 & 14 Mile
Vasu, Rodgers & Connell Chapel
248.549.0500

TROY • ROCHESTER ROAD
between Big Beaver & Wattles
Price Chapel
248.689.0700

memorials | cremation | burial | funerals




# आरोग्यम् धनसंपदा

नेहेमीच येतो हा हिवाळा .....! मिशीगन मध्ये राहणाऱ्यांना थंडी, बर्फ, घसरडे खराब रस्ते नवीन नाही. डिसेंबरच्या छान सुट्टया कुठे तरी गरम ठिकाणी मस्त दिवस घालवून जानेवारीचे नवीन वर्ष येते. हे जरी वर्षानुवर्षे चालू असले तरी ह्यावेळी थंडी /बर्फ कमी असेल असे उगाचंच वाटते (अगदी Global warming ची complainT सुद्धा ). मानवी स्वभाव असा आहे की त्याला सतत काही तरी करायचे असते किंवा कुठे तरी अधिकार (control) गाजवायचा असतो. निसर्गावर आपला अजिबात control नाही हे आपल्याला लक्षात येते , मग आपल्या मनावर तरी आपला control आहे का? २ मिनिटे एका जागी बसून तुम्ही स्वतःला observer च्या भूमिकेतून बघितले तर जाणवेल ते तर प्रचंड अवघड आहे. मनातले विचार इतक्या प्रचंड वेगाने एका विषयावरून दुसऱ्या विषयावर जात असतात. तेवढे शरीर जर हलले तर किती calories burn होतील विचार करा ! योग (yoga) आपल्यापैकी कोणालाही नवीन नाही, सध्या तर WA university / social media ह्यामुळे आपल्यावर नको तितक्या ज्ञानाचा भडिमार होत असतो. नवनवीन reels, मनाला येईल ते post करत असतात, त्याचा खरे-खोटेपणा,फायदा /तोटा ना टाकणारे बघतात ना follow करणारे !

मला खात्री आहे खूप लोकांना योग / exercise विषयावर माहिती आहे, बरेच वाचन आहे. बरेच लोकं काही गोष्टी करतही असतील, पण एक महत्वाचा प्रश्न स्वतःला विचारा "मी हे सातत्याने करतो आहे का?" (consistency is the key), ते असेल तर छानच पण नसेल तर का नाही ह्याचा स्वतःशी प्रामाणिकपणे विचार करा , हे सुद्धा एक meditation / चिंतन आहे. आपल्याला ५ ज्ञानेंद्रिये (डोळे ,कान ,नाक ,त्वचा ,जिव्हा ) मिळाली आहेत, या इंद्रियांच्या सहाय्याने आपल्याला बघणे (Sight), ऐकणे (Hearing), स्पर्श जाणवणे (Touch), चव घेणे (Taste) आणि गंध ओळखणे (Smell) शक्य होते. पण मानवी स्वभाव असा आहे की आपण सतत बाहेरच्या जगात गुंतून राहतो, मी कोण (who am I), माझे मन ह्या क्षणी कुठे आहे याचा विचार करायला आपल्याला जराही फुरसत नसते.



आपल्याकडे खूप थोर ऋषी-मुनी होऊन गेले , मानवी मन, मनाच्या वृत्ती ह्यावर खूप अभ्यास झालेला आहे (याचे महत्व कोणी American /European लोकांनी सांगितले कि आपल्याला पटते).

योग करायला सुरुवात करताना आपण एक प्रार्थना (invocation) म्हणतो.

This invocation is to honor Patanjali, the sage who compiled the Yoga Sutras. This prayer is recited to invoke his wisdom and knowledge in yoga practices

**योगेन चित्तस्य पदेन वाचां मलं शरीरस्य च वैद्यकेन ।**
**योऽपाकरोत् तं प्रवरं मुनीनां पतञ्जलिं प्राञ्जलिरानतोऽस्मि ॥**
**आबाहु पुरुषाकारं शङ्खचक्रासि धारिणम्।**
**सहस्र शिरसं श्वेतं प्रणमामि पतञ्जलिम् ॥**

Translation:

"I bow down to him who purifies the mind (citta) through yoga (yogena), the speech (pada) through grammar (padena), and the body (sharirasya) through medicine (vaidyakena). He who is an expert in removing the impurities of the mind, speech, and body, to that most excellent of sages, Patanjali, I bow down with folded hands."

योगाचे आद्यगुरू (जनक) महर्षी पतंजलीना उद्देशून हि प्रार्थना आहे, ज्यांनी आपल्याला योग, व्याकरण आणि आयुर्वेद दिले. योगा मुळे मनाचे दोष नाहीसे होतात, व्याकरणामुळे भाषा शुद्ध होते आणि आयुर्वेदा मुळे शरीर स्वस्थ /निरोगी राहते. पतंजली मुनींनी त्यांच्या योगसूत्रात मनाचे सूक्ष्म विश्लेषण केले आहे.
पतंजलीयोगसूत्रात १९६ योगसूत्रे आहेत , प्रत्येक सूत्र म्हणजे अगदी छोटे वाक्य, जणू काही त्यावेळी ही पंतांजलीना कल्पना होती कि पुढच्या काळात लोकांचा Attention span किती कमी असणार आहे. पतंजलीनी योगची अगदी सध्या शब्दात व्याख्या सांगितली आहे, योग म्हणजे काय?

**योगश्चित्तवृत्तिनिरोधः**
योग म्हणजे चित्तवृतीचा निरोध, Yoga is containment of the activity of the mind, very short and simple definition, he doesn't say anything about postures or breathing, he simply says CONTROLLING MIND IS YOGA.

आपण योग का करतो किंवा का करावा ह्याचे ऊत्तर पतंजली देतात ते असे
**तदा द्रष्टुः स्वरूपेऽवस्थानम् ।**
We practice yoga to find our True Self and abide in our true nature.

वरची हि दोन्ही सूत्र बघितली कि लक्षात येईल पतंजली, जे योगाचे पिता समजले जातात त्यांनी **योग म्हणजे मनाच्या वृत्ती समजून घेणे, आणि त्या वृत्तीवर नियंत्रण ठेवायला शिकणे. This is the core of Yoga.**

पतंजली मुनींनी योगसूत्रात (साधनपद श्लोक # २९) अष्टांग योग (8 limbs Yoga )सांगितला आहे.
**यम नियमासन प्राणायाम प्रत्याहार धारणा ध्यान समाधयोऽष्टावङ्गानि ॥ २.२९॥**
पतंजलींनी सांगितलेल्या अष्टांग मार्गाच्या क्रमाला महत्व आहे. यम,नियम,आसन,प्राणायाम,प्रत्याहार, धारणा,ध्यान,समाधी अश्या ८ चढत्या स्वरूपात पायऱ्या आहेत. यम, नियम पाळून पुढच्या पायऱ्या आसन, प्राणायाम आहेत, ज्या बहुतेकांना परिचित आहेत.

१. **यम** – ५ प्रकारची नैतिक आणि सामाजिक तत्वे
- अहिंसा - शारीरिक (कृतीने) / मानसिक हिंसा न करणे
- सत्य - खरेपणा (स्वतःबरोबर आणि जगाबरोबर)
- अस्तेय - चोरी न करणे (आपले नाही त्यावर हक्क न दाखवणे)
- ब्रह्मचर्य - आत्मसंयम
- अपरिग्रह - लोभ सोडणे (Detachment)

२. **नियम** - पतंजलींनी ५ गोष्टी सांगितल्या आहेत ह्या ५ गोष्टी स्वतःकरिता आहेत.
- शौच - अंतर्गत आणि बाह्य स्वच्छता
- संतोष - समाधान
- तपस - स्वयंशिस्त
- स्वाध्याय - अभ्यास
- ईश्वरप्रणिधान - अहंकार सोडून दिव्य शक्तीला शरण जाणे

३.**आसन** - शरीर आणि मन कणखर, लवचिक राहण्यासाठी साधने

४.**प्राणायाम** - प्राण / श्वासावर नियंत्रण, synchronize breath with movements.

५. **प्रत्याहार** -अनावश्यक गोष्टीतून अंग काढून घेणे

६. **धारणा** - एकाग्रता / Focus

७.**ध्यान** - मनावर पूर्णपणे लक्ष्य केंद्रित करणे

८. **समाधी** - संपूर्ण शरणागती (Complete Surrender), अतीव आनंद स्थिती

अष्टांग मार्गावरील आसन आणि प्राणायाम आपल्या सर्वांना पूर्ण परिचयाचे आहेत. आसन आणि प्राणायाम हे केवळ exercise नाहीत. आपण पहिल्या २ पायऱ्यांकडे दुर्लक्ष करतो आणि directly आसन, प्राणायाम करतो आणि परत मधले गाळून ध्यान/meditation चा प्रयत्न करतो आणि म्हणतो "मला meditation जमत नाही. ह्याला स्वामी सर्वप्रियानंद (रामकृष्ण मिशन ) म्हणतात "तुम्ही अष्टांग योग नाही विकलांग योग करत आहात."

आसनासाठी महर्षी पतंजलींनी सांगतले आहे – **स्थिरसुखमासनम् २.४६** (sthira sukham asanam)
ज्या आसनात तुमचे शरीर स्थिर, निश्चल रहाते व ज्यामध्ये आपल्याला सुखं लाभते.

योगासने करताना प्रत्येक स्थितीत श्वासाची जाणीव ठेवली, तर मन आपोआप शांत होते आणि मन शांत असेल तर शरीर स्वस्थ रहाते. स्वतः मध्ये स्थिर म्हणजे स्वस्थ. Swastha is a state where body, mind, senses and all 3 doshas are in perfect balance and blissful harmony.

क्रमशः (To be Continued...)

**अंजू वळे**

Sistar Mortgage
Company
A Nationwide Lender

35871 Mound Road, Ste. 201,
Sterling Heights, Michigan 48310

info@sistarmortgage.com
+1 (888) 841-4238 (24/7)




PATEL BROTHERS
Wishing you a season of
rising high
&
shining bright.


Suhana
Suhana
PANEER TIKKA
Suhana
Khaman Dhokla
Suhana
VEGETABLE BIRYANI
Suhana
PANEER CHILLI
Suhana
Pavbhaji Masala
Pravin
Mango
Suhana
Kitchen King Masala
SPICE UNIVERSE
SPICE UNIVERSE LLC
info@spiceuniverseusa.com
+1(947)267 1733
spiceuniverseusa.com

# Our Place in the Universe

When I was young, I used to look up at the night sky and ask questions that had no clear answers.

Who are we? Why are we here on Earth? Is there life elsewhere in the universe? What is life, really? And when life ends, what—if anything—comes after?

These are not scientific questions in the strictest sense. They are human questions. And perhaps that is why they have followed us for as long as we have been able to look up.

Some of these questions may never be answered. Others may only be answered partially, or in ways that feel unsatisfying. Yet the act of asking them has shaped our civilizations, our religions, our sciences, and our understanding of ourselves. The night sky has always been more than a collection of lights. It has been a mirror—one in which humanity has searched for meaning, direction, and reassurance.



*Milky way arm as seen from Hocking hills, Ohio*

To understand how deeply this search runs, it helps to look back at how we once understood the universe.

**When Earth Was the Center of Everything**

For most of human history, we believed Earth sat at the center of the universe. The Sun, the Moon, the planets, and the stars were thought to revolve around us. This idea made intuitive sense. After all, we did not feel the Earth moving, and the heavens appeared fixed and orderly above us.

Ancient civilizations built elaborate models to preserve this belief. The sky was seen as purposeful and structured, its motions tied to seasons, fate, and divine will. The heavens were thought to exist for our benefit, our guidance, or our judgment. Humanity was central not only physically, but morally and spiritually.

Letting go of this idea was neither quick nor easy.

Science dismantled this view slowly and painfully. First, we learned that Earth orbits the Sun. Then we learned that the Sun is not the center either—it orbits the center of the Milky Way. Later, we discovered that the Milky Way itself is not special at all. And finally, we learned that the universe has no center.

Every step removed us further from cosmic importance—and closer to a truer picture of reality.

**A Universe Larger Than Imagination**

As our understanding expanded, so did the scale of the universe itself.

Modern science tells us that the universe is far larger than anything our minds evolved to comfortably grasp. The distances involved are so immense that we measure them not in kilometers or miles, but in light-years—the distance light travels in a single year, nearly ten trillion kilometers.

Our home, Earth, orbits the Sun, which is one star among roughly 100 billion stars in the Milky Way galaxy. The Milky Way itself is just one galaxy among an estimated hundreds of billions of galaxies in the observable universe. Each of those galaxies contains billions to trillions of stars of its own.



*Bode's Galaxy (M81) and the Cigar Galaxy (M82), two galaxies beyond the Milky Way, each containing billions of stars*


In other words, the universe is not just big. It is lavishly big.

And this vastness is not static. Space itself is expanding. Galaxies are moving away from one another, carried by the growth of space since the universe's beginning nearly 13.8 billion years ago, in an event we call the Big Bang. That beginning was not an explosion in space, but an expansion of space—from a hot, dense state into the cosmos we see today.

Everything we observe—matter, energy, and even time itself—emerged from that origin.

**What Are Stars, Nebulae, and Galaxies?**

The points of light we see in the night sky are not small or distant decorations. Stars are massive spheres of hot gas, powered by nuclear fusion, converting hydrogen into helium and releasing enormous energy in the process. Our Sun is one such star—ordinary by cosmic standards, yet vital to life on Earth.



*Our Sun*

Between the stars lie nebulae, vast clouds of gas and dust scattered through space. Some are stellar nurseries, where new stars are born. Others are the remains of dead stars, their material returned to the cosmos to be reused. They are reminders that the universe is not wasteful. It recycles, reshapes, and rebuilds.



*M45, The Pleiades Star Cluster commonly known as the seven sisters*

Galaxies are vast cities of stars, gas, dust, and dark matter, bound together by gravity. Over billions of years, they collide, merge, evolve, and sometimes tear each other apart. On these scales, time behaves differently. What feels eternal to us is fleeting to the universe.



*Cosmic Ballet – Two galaxies colliding with each other*


Understanding these structures forces us to confront a deeper question: how did something so complex come into being at all?

**How It All Began?**

According to our best understanding, the universe began in a simple state and grew more complex over time. From elementary particles came atoms. From atoms came stars. From stars came heavier elements. From those elements came planets. And on at least one planet, chemistry became biology, and biology became awareness, the life today.

This is not a story of intention. It is a story of consequence.

The atoms in your body were forged in ancient stars that lived and died long before Earth existed. You are not separate from the universe—you are a temporary arrangement of it.



*The Heart and Soul Nebulae – Stellar Nurseries*

**Sobering Perspective**
This realization can feel unsettling. In the cosmic scale, we are small. Our planet is fragile. Our species is young. Our existence is brief.

The universe does not know we are here. It does not require us. It does not promise meaning, justice, or permanence. Stars will continue to burn whether we exist or not. Galaxies will collide long after Earth is gone.

In that sense, we are no one in the cosmic scale.



*A widefield image of the Virgo cluster of galaxies. This image has more galaxies than stars*

And yet, this understanding does not have to lead to despair.

**Meaning in a Vast Universe**
If the universe does not give us meaning, then meaning is not something we can lose. It is something we create.

We are the universe, briefly aware of itself. For a short time, matter has learned to think, to question, to wonder about its own origin and fate. That awareness may be rare. It may be temporary. But it is real.

The same cosmos that is indifferent also made this curiosity possible.
Perhaps our place in the universe is not to be central, but to be conscious. Not to be important in size or power, but in perspective. To look out into the darkness and ask questions—even knowing they may never be answered.



*Comet Lemmon - A long-period comet with an orbital period of over 1,000 years*

When I look at the night sky now, the questions remain.
Who are we? Why are we here? Is there life elsewhere? What lies beyond life itself?
The universe may never answer. But the asking still matters.


**Author**

**Devesh Pande**

**Ph: 248-949-7557**

**www.astrodarks.com**
**www.instagram.com/astrodarks**
**astrodarks1@gmail.com**


*All images shown in this article are original astrophotography by the author.*
*Questions and conversations are welcome—please feel free to reach out.*

महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट

एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ

# Maharashtra Mandal of Detroit

present

FIVE DIMENSIONS ENTERTAINMENT

# गुढी पाडवा

2026 Gudhi Padwa




## Sunday March 22

SCAN TO BOOK SEATS

## HURON HIGH SCHOOL
Ann Arbor

Registration, Pooja & Lunch: 10:00am - 1:45pm | Natak: 2:00 - 4:30pm

Program Manager: Kunal Waykole | (248) 931-1157

Babysitting available: $12/kid

Member Rates: $48, $40, $32, $28

Non-Member Rates: $60, $50, $40, $35, $30

# खोबऱ्याचे अनारसे

नमस्कार मंडळी,

ह्या वर्षी अधिक महिना असल्यामुळे वाणात अनारसे हा महत्त्वाचा पदार्थ तर आलाच! पण नेहमीप्रमाणे पारंपारिक अनारसे न बनवता यंदा वेगळे, झटपटीत पण चविष्ट अनारशांचा प्रकार असे अनारसे बनवून घरच्या मंडळीनाही खुश करून टाका.

पाकृती खालीलप्रमाणे :-



साहित्य - दोन किंवा तीन खोबऱ्याच्या वाट्या , साखर, मैदा, तूप, खसखस ( ऐच्छिक)

**कृती -**

खोबऱ्याच्या वाट्या रात्रभर कोमट पाण्यात भिजवून ठेवा. सकाळी पाण्यातून काढून कापडाने पुसून घ्या. खोबऱ्याच्या वाटीची काळी पाठ सोलण्याने सोलून घ्या. किसणीने मग खोबरे किसून घ्या. खोबऱ्याचा कीस जर एक वाटी असेल तर जाड साखर अर्धा वाटी घेऊन मिक्सरला बारीक करणे. एका भांड्यात पाव कप मैदा, बारीक केलेली साखर, खोबऱ्याचा कीस आणि वितळलेले तूप घट्ट गोळा बनेल इतपत घालावे. नंतर छोटे छोटे गोळे निर्लेपच्या तव्यावर थापावे. त्यावर खसखस लावू शकतो. तव्याला तेल किंवा तूप लावायची गरज नाही. अनारसे मध्ये थोडे अंतर असावे. अनारसे खालून थोडे लालसर झाल्यावर गॅस बंद करा. हे अनारसे मंद आचेवर करायचे आहेत. तवा गार झाला की अनारसे आपोआप तव्यावरून निघतात. त्यांना करताना उलटवायचे नाही. वरील प्रमाणात मध्यम आकाराचे दहा ते पंधरा अनारसे होतात.

**गायत्री येवला**



# मला आवडलेलं पुस्तक :- लेट देम    लेखिका :- मेल रॉबिन्स .

"तो असं का बोलला मला ?" ;
" ती फक्त माझ्याशीच अशी वागते " ;
" कितीही कामं करा , बॉस काही फार कौतुक करत नाही. "
" मीच का सारखा मेसेज करू? "
असे अनेक भावनिक प्रश्न आपल्याला बऱ्याचदा पडत असतात. आणि त्यानंतर सुरू होतो स्वतःशी संवाद .. पूर्वी घडलेल्या घटना आणि प्रसंगांची कधी न संपणारी वेबसिरीज आपण रिपीट टेलिकास्ट म्हणून बघत राहतो आणि धुमसत राहतो आतल्या आत .
ह्या सगळ्या विचारांच्या गर्दीत मेल रॉबिन्स ह्यांचं "लेट देम " हे पुस्तक आपल्याला एक अत्यंत साधा पण आयुष्य बदलणारा विचार देते -Let them .
खरं तर पुस्तकाच्या शीर्षकातच पुस्तकात काय आहे हे अगदी सहज कळतं; पण ते करणं का महत्वाचं आहे हे ह्या पुस्तकात खूप छान मांडलंय .


हे पुस्तक मोठ्या तत्त्वज्ञानाने भारलेलं नाही, ना अवघड शब्दांनी. उलट, अगदी रोजच्या आयुष्यात घडणाऱ्या प्रसंगांतून लेखिका आपल्याला एक महत्त्वाची गोष्ट शिकवते — आपण सगळ्यांवर नियंत्रण ठेवू शकत नाही, आणि ते ठेवायची गरजही नाही.

ह्या लेट देम थेअरी चे दोन भाग आहेत . दोनही भाग अत्यंत महत्वाचे .
१. लेट देम
२. लेट मी ..
‘Let Them थेअरी  नेमकं काय सांगते ?
Let Them म्हणजे लोकांना त्यांच्यासारखं वागू द्या.
ते काय बोलतात, काय ठरवतात, कसे बदलतात — त्यांना करू द्या.
हे ऐकायला सोपं वाटतं, पण प्रत्यक्षात हे स्वीकारणं फार कठीण असतं. Mel Robbins सांगतात की आपण इतरांच्या कृतीवर जास्त लक्ष देतो आणि त्यामुळे आपली ऊर्जा, शांतता आणि आत्मसन्मान गमावतो. Let Them हा विचार आपल्याला हे सगळं परत मिळवून देतो.
लेट मी ... म्हणजे आपण काय करायचंय ?
मला माझ्या वागण्यावर आणि कृतीवर लक्ष केंद्रित करायचंय !!
मला स्वतःला बदलायचंय !!

मला माझ्या प्रतिक्रियेवर आणि त्या देण्याच्या पद्धतीवर नियंत्रण मिळवायचे आहे..
पुस्तकाच्या सुरुवातीच्या भागात आपल्याला लेट देम थेअरी म्हणजे काय ? ज्या गोष्टी आपल्या नियंत्रणाच्या बाहेर आहेत त्यामध्ये वेळ घालवायचा नाही आणि त्या ऐवजी माझ्या नियंत्रणात काय आहे आणि त्यावर मला काय करता येईल हे सांगितले आहे. नंतर हळूहळू लेखिका आपल्या आयुष्यात घडणाऱ्या वेगवेगळ्या घटना गोष्टीच्या स्वरूपात सांगते आणि त्यावरच्या आपल्या प्रतिक्रिया किंवा विचार बदलून आपला मानसिक ताण कसा कमी करता येईल हे अगदी सोप्या भाषेत मांडते. अगदी घरातल्या माणसांपासून ते ऑफिस मधल्या सहकार्यांपर्यंत, सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या अनुभवांपासून ते आपल्या जवळच्या मित्रमैत्रिणींपर्यंत अशा सगळ्या प्रकारच्या माणसांसोबत हि थेअरी कशी वापरायची हे या पुस्तकात उत्कृष्टपणे समजावले आहे .
कोणतीही गोष्ट, घटना किंवा माणसं ह्यांना नियंत्रणात ठेवणं हे आपलं कर्तव्यच आहे असं आपल्याला नेहमी वाटतं . पालकांना कायमच मुलांची काळजी असते .. हि गोष्ट कशी करतील , जमेल का? लहान आहे ..मला मदत करायला हवी किंवा लोकं नियम का पाळत नाहीत? किंवा कोणतेही राजकीय बदल अशा अनेक वेगवेगळ्या गोष्टी त्याचे आपण करून घेतो ते मानसिक परिणाम आणि होणाऱ्या ऊर्जेचा अपव्यव कसा थांबवायचा हे लेखिका उत्तमपणे सांगते .

कधी कधी दुसऱ्या कुणाच्यातरी भावनिक प्रतिक्रियेवर आपण खूप विचार करतो किंवा आपल्याच एखाद्या जवळच्या व्यक्तीला आपण प्रोत्साहन द्यायला जातो, भावनिक आधार द्यायला जातो पण ती व्यक्ती आपल्याला हवा तसा प्रतिसाद देत नाही आणि आपण दुखावले जातो.

लेट देम आपल्याला नेमकं हेच सांगते ..
प्रत्येकाच्या भावना, निर्णय आणि वर्तनाची जबाबदारी आपली नाही.इतरांना बदलण्याचा अट्टहास आपल्याला थकवतो. जेव्हा आपण "Let Them" म्हणतो, तेव्हा प्रत्यक्षात आपण स्वतःला मुक्त करतो
हे पुस्तक आपल्याला शिकवतं की,
कोणी तुम्हाला ignore करत असेल — let them.
कोणी तुमच्याशी सहमत नसेल — let them.
कोणी तुमच्या आयुष्यातून दूर जात असेल — let them.
कारण ज्यांना राहायचं आहे, ते कारण न देता राहतात.
आणि ज्यांना जायचं आहे, त्यांना थांबवूनही आपण स्वतःलाच दुखावतो.




हे पुस्तक का वाचायला हवं?
हे पुस्तक तुम्हाला मानसिक शांतता देतं . नात्यांकडे वेगळ्या नजरेने पाहायला शिकवतं. स्वतःवर लक्ष केंद्रित करायला शिकवतं. अनावश्यक अपेक्षांपासून मुक्त करतं
Let Them म्हणजे हार मानणं नाही.
Let Them म्हणजे स्वतःची किंमत ओळखणं.
Mel Robbins यांनी मांडलेली ही संकल्पना साधी असली तरी अतिशय प्रभावी आहे. म्हणूनच 'Let Them' हे पुस्तक फक्त वाचण्यापुरतं न राहता, जगण्याचा एक नवा दृष्टिकोन देतं.

**सायली चिमणपुरे कुलकर्णी**



# Our Bronze Sponsors

ASMI Dance Academy

TAYION COLLECTION

Soul PELVIC FLOOR THERAPY

Namaste Flavours

VIRASAT THE HERITAGE INDIAN CUISINE

SUGUNA'S Beauty Touch

Roshan Pathre Real Estate Agent

SAMI'S ENGRAVING & GIFTS

GOLD ADVENTURE

taal academy DEDICATED TO TRAINING IN KATHAK DANCE

KIRAN & DEEPA INGLE

BEST WISHES FROM SHEETAL SONAR

V2SOFT Innovation Through Intelligence.

# Our Bronze Sponsors

Paradise
BIRYANI POINTE

Century 21
Town & Country

GLOWING SMILES DENTAL

Best Wishes
from
Dr Raman Saluja

Best Wishes
from
Dr. Atul
Rajpurkar

Sabrina's
SALON

Yummy In Tummy
with Saroj

Ashoka
Indian
CUISINE

EXPERIENCE THE LIFE
MI ADVENTURES'23

KARMA REALTY
HOLDINGS LLC
ARCHITECTURAL CONSERVATION THROUGH URBAN LIVING AND WORKING SPACES

Best Wishes
from
Prem Khilnani

ARGHYA
CONCERTS
DETROIT

# डब्बेच डब्बे चोहीकडे ग बाई.......

जवळ जवळ पन्नास वर्षांपुर्वीची कथा. भारतातून, मध्यमवर्गीय घरामधून इंग्लंड/अमेरिकेला (आजीच्या भाषेत "विलायतेला"), खिशात आठ-दहा डॉलर व एक सूटकेस घेऊन विद्यार्थी किंवा शिकाऊ उमेदवार म्हणून येणे हे एक साहसच होते. काही नशीबवान लोकांचे दूरचे नातेवाईक आधीच येथे येऊन स्थायिक झालेले होते, काहींचे मित्र/मैत्रिणी होते. पण बहुतेक सारे तसे अंधारात उडी मारूनच "आता तिकडे जाऊनच काय ते बघू" अशा धाडशीपणे आलेले. हळूहळू विद्यापीठात, हॉस्पिटलमध्ये, कामाच्या ठिकाणी ओळखी झाल्या. कोणी उदारपणे आपल्या गाडीमधून खरेदीसाठी घेऊन गेले, तर कोणी Driving शिकवले. स्त्रियांच्या बाबतीत स्वयंपाकाच्या टिप्स आणि पाककृतीची देवाणघेवाण यामुळे मैत्रीचे धागे दृढ झाले. छोटीशी पण रिकामी अपार्टमेंट्स तेव्हा खायला उठायची, घराच्या आठवणीनी पोटात खड्डा पडायचा व डोळे भरून यायचे. स्वयंपाकात माझी गती यथा-तथाच असल्यामुळे त्या प्रांतात वेगाने प्रगती करण्याची निकडही तीव्र होतीच.

तशात एका चुलत मैत्रिणीने, म्हणजे मैत्रिणीच्या मैत्रिणीने शनिवारी संध्याकाळी जेवायला बोलावले. आमच्याच हॉस्पिटलच्या प्रचंड अपार्टमेंट कॉम्प्लेक्समधे तीही राहात होती. तिचे घर बघून तर मी दिपूनच गेले. संपूर्ण सोफासेट तोही एकाच रंगाचा! (सेकंड नव्हे, थर्ड नव्हे, तर चक्क फोर्थ हॅन्ड हे तिनेच प्रामाणिकपणे सांगून टाकले). सुसज्ज, चिमुकले स्वयंपाकघर (कॉर्निंगच्या कपबशांचा सेट असलेले), व कॉल स्केड्युल सांभाळून तिने केलेला साधासा, पण रुचकर बेत. स्वयंपाकाच्या तिने खूप काही उपयोगी टिप्स दिल्या आणि माझ्या डोळ्यात आशेच्या, महत्त्वाकांक्षेच्या ज्योती पेटायला लागल्या. सर्वात कळस म्हणजे तिच्या घरून निघताना तिने माझ्या हातात एक मोठा खोका ठेवला. "तू येणार असे कळल्यापासून गेले दोन महिने गोळा करते आहे... ". मी उत्सुकतेने खोका उघडून पहिला, तर त्यात विविध आकाराचे, विविध प्रकारचे रिकामे डबे व बाटल्या/बरण्या होत्या. भावनातिरेकाने व कृतज्ञतेने माझा गळा दाटून आला. कारण माझ्या स्वयंपाकघरातल्या कपाटांमध्ये डाळी, मसाले, तांदूळ, पीठं वगैरे असंख्य वस्तू अजून प्लॅस्टिकच्या पिशव्यांमध्येच दाटीवाटीने व अस्ताव्यस्तपणे विखुरल्या होत्या. घरी आल्याबरोबर जमेल तितक्या वस्तू मी त्या डबे/बाटल्यांमधे अति उत्साहाने भरून ठेवल्या हे सांगायला नकोच.




त्या वेळी "स्मकर्स " हा जॅम फार लोकप्रिय होता. "तुम्ही कुठला जॅम वापरता? स्ट्रॉबेरी वापरात असाल तर रिकाम्या बाटल्या माझ्यासाठी ठेव बरं का!" एका सहाध्यायीणीने विनंती केली. नंतर केव्हातरी तिच्या घरी गेल्यावर कपाट उघडून त्यातील चौदा/ पंधरा एकसारख्या, लाल झाकणाच्या, स्मकर्स जॅमच्या कशा-कशाने भरलेल्या बाटल्या तिने अभिमानाने दाखविल्या. उपनगरातील एका छोट्या हॉस्पिटलात दोन महिने रोटेशन करताना कॅफेटेरियात वेगवेगळी फळे, पिकल्स, व्हिनेगरमधल्या मिरच्या (बनाना पेपर्स) इत्यादी  ठेवलेल्या दणकट बरण्या बघितल्या- आतील वस्तू संपल्यावर त्या फेकून देतानाही बघितले, मग धीर करून त्या फेकण्याऐवजी मला देण्याची माझी विनंती ताबडतोब मान्य झाली. पण एवढ्या मोठ्या बरण्यांचा उपयोग काय या प्रश्नाला उत्तर देतादेता माझी पुरेवाट लागली. मग माझ्या साठवणीच्या कपाटामध्ये त्या दहा बारा मोठमोठ्या बरण्या सगळ्या डाळी, वेगवेगळी पीठं, कडधान्ये कशाकशानी भरून जाऊन विराजमान झाल्या.

साधे दह्याचे, सावर क्रिमचे डबेही अगदी स्वच्छ धुवून पुसून पुन्हा-पुन्हा वापरले जायचे. "अमुक एका कंपनीचीच लोणची आम्ही वापरतो, कारण बरणी अगदी उपयोगी आकाराची आणि सुबक घाटाची असते ना!"- इति एक मैत्रीण. बेबी फॉर्मुला पावडर, रिकोटा चीज. शेंगदाणे इत्यादी पदार्थांचे डबे आम्ही जपून ठेवत असू व देवाण-घेवाणीसाठी मुक्तहस्ताने वापरात असू. एवढीशी उरलेली आमटी, किंचितशी उसळ, मोड आलेली मटकी वगैरे निगुतीने काढून ठेवायला हे छोटे डबे अत्यावश्यकच होते!



एक छोटा, सुबकसा, शेंगदाण्याचा रिकामा डबा, मी हिरव्या सफरचंदाचे लोणचे घालून मैत्रिणीला दिला. नंतर गन पावडर चटणी पूड, सोलापुरी शेंगदाण्याची चटणी, बटाट्याचा नमुन्यादाखल चिवडा, तिळगुळाच्या वड्या असे विविध पदार्थ पोटात घेत शेवटी तीन चार महिन्यांनी माझ्याचकडे परत आला. वाईनच्या बाटल्या जशा मित्र-मैत्रिणींच्या वर्तुळात फिरत राहतात, अगदी तसाच. मीही मग गरम पाण्याने घासून-पुसून पुन्हा त्यात आवडत्या सुक्या ब्याडगी मिरच्या ठेवून दिल्या.

नंतर "टप्पर वेअर" चे जरासे महाग डबे व त्यांच्या "पार्ट्या" यांची जोरदार लाट आली. हळू-हळू वेगवेगळया आकाराचे प्लास्टिकचे किंवा काचेचे डबे कुठे मिळतात याचा शोध लागला, ते डझनावारी विकत घेण्याची ऐपतही आली. पण अजूनही पास्ता सौसची बाटली किंवा काजूचा रिकामा डबा कचर्यात फेकून देण्याआधी नवरा व लेक माझ्या धाकाने विचारूनच मग टाकून देतात. मायक्रोवेव्ह ओव्हनमध्ये वस्तू गरम करता येतील असे डबे अजूनही भाव खाऊन आहेत.

जेव्हा कमला हॅरिस अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी रिंगणात उतरल्या होत्या, तेव्हा मैत्रीण मिंडी कलिंग हिच्याबरोबरचा एक व्हिडिओ प्रसिद्ध झाला होता. तिच्या स्वयंपाकघरातल्या कपाटात कमळाबाईंनी "टेस्टर्स चॉईस" या कॉफीच्या ओळीने लावलेल्या बरण्यांमध्ये मसाले ठेवलेले बघितले आणि "माझी आई पण अगदी अस्सेच मसाले साठवत होती" हे जाहीर करून टाकले! म्हणजे हे रिकामे डबे/बाटल्या/बरण्या जीव लावून जपून ठेवण्याचे वेड फक्त मराठमोळ्या सुगृहिणींपुरतेच मर्यादित नाही हे समजून मला धन्य धन्य वाटले.

आठवतात का, आपल्या आई-आजी- मावशी- काकू वगैरेंच्या स्वयंपाकघरातले, त्यांच्या अभिमानाचा विषय असलेले, कपाटांमधले (आजीच्या शब्दात- फडताळातले) ते कप्पे? अगदी चकचकीत पितळेचे किंवा स्टेनलेस स्टीलचे डबे "उंचीसे एक कतार " विराजमान झालेले? हवा त्याच उंचीचा डबा मिळवायला बोहारणीशी घातलेली हुज्जत, तुळशीबागेतल्या चकरा, दिवाळीच्या आधी सगळे डबे काढून ते पुन्हा घासून, पुसून लखलखीत करून ठेवण्याची गडबड हे सारे जवळ-जवळ इतिहासजमाच झाले आहे. संक्रांतीचे वाण म्हणून दिलेले छोटसे स्टीलचे डबे वेलदोड्याची पूड, केशर, कापूर अशा अनेक गोष्टींसाठी मी अजून वापरते.

पण सगळ्यात माझा आवडता- अगदी "मर्मबंधातली ठेव" असलेला असा एक डबा आहे बरं का- कारण त्यावर कोरलेले आहे- "सौ. इंदिराबाई देव यांजकडून अधिक मासानिमित्त जावईबापूंना “आशीर्वादपूर्वक" ! म्हणजे माझ्या आईच्या आईने माझ्या तीर्थरुपांना त्या वेळच्या प्रथेप्रमाणे त्या डब्यात बेसनाचे, मोतीचुराचे लाडू किंवा खानदेशच्या खास खव्याच्या साठोऱ्या घालून दिल्या असणार! मी तो डबा जपून ठेवला आहे. जर चुकून कोणाला त्यामध्ये काही घालून दिलं तर मी त्यावरचे कोरीव काम दाखवून तो डबा माझ्यासाठी किती महत्त्वाचा आहे व तो माझ्याकडे परत येणे कसे आवश्यक आहे हे पुन्हा पुन्हा सांगूनच देते. तो डबा म्हणे "पेढेगाठी " की "पेढेघाटी" आहे. -जाणत्यांनी खुलासा करावा.


तुमच्याही घरी असतीलच ना कमीत कमी दोनतीन Drawers असे रिकाम्या डब्यांनी व त्यांच्या झाकणांनी भरलेले?

**वीणा शाह**


HAPPY
MAKAR
SANKRANTI
Ram Creations
Jewelry & Gifts
28974 Orchard Lake Rd
Farmington Hills, MI 48334
Call us: (248) 851-1400
info@ramcreations.com, www.ramcreations.com


Why choose Jaya Travel & Tours?
Our reputation speaks for itself!
An office in Mumbai, India to better serve you
24/7 support with our multilingual travel experts
Lowest airfare rates to and from India and worldwide
5% off on cruises or tour packages
SERVING METRO DETROIT FOR 49 YEARS
Call Jaya Travel To Book Today!
877-359-5292 | JAYATRAVEL.COM | letsgo@jayatravel.com
JAYA
TRAVEL & TOURS
Europe Tours Starting at $1,999
49 years of tour planning experience!
To Book Call 1-800-209-0187 or Email letsgo@jayatravel.com
All-inclusive land packages with:
Daily Indian vegetarian and non-vegetarian meals with Jain or Swami Narayan food available with request
Guaranteed departure dates April through October
Superior hotel accommodations
Sightseeing, excursions, entrance fees, and transfers
Jaya Travel tour manager throughout the tour
For details

# मराठी चित्रपट २०२५ - माझ्या नजरेतून



नमस्कार डेट्रॉईटकर!



नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!
नवीन वर्षात पाय ठेवताना आपण सगळेच पुन्हा एकदा मागे वळून २०२५ कडे बघितले असणार तसे मीही बघितले. एकंदरीत २०२५ माझ्यासाठी संमिश्रित होते. काही आनंदाचे क्षण जसे महिलांनी जिंकलेला वर्ल्ड कप, शुभांषु शुक्लाचे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणे, महाराजांच्या अठरा किल्ल्यांचा युनेस्कोच्या यादीत झालेला समावेश इ. तसेच काही मनाला चटका लावणारे प्रसंग सुद्धा घडले. पुलवामा, दिल्ली बॉम्बब्लास्ट आणि अजूनही कितीतरी.
२०२५ इंडियन सिनेमा करिता सुद्धा संमिश्र होते असे मला वाटते. छावा, सावरकर, कांतारा, धुरंधर असे काही हिट आणि सुपर-हिट सिनेमे आले आणि प्रेक्षकांनी या सिनेमांना अक्षरशः डोक्यावर घेतले. पण मग मराठी सिनेमाचे काय? कसे होते २०२५ मराठी सिनेमा इंडस्ट्री करिता? मागच्या वर्षी तब्बल ११०+ मराठी चित्रपट प्रदर्शित झाले! होय, ११०+ म्हणजे आठवड्याला सरासरी २ मराठी चित्रपट येऊन 'गेले'. मी पैज लावून सांगतो यातल्या १५ चित्रपटांचीसुद्धा तुम्हाला नावं माहिती नसणार आणि पाच पेक्षा जास्त पाहिले नसणार, अगदी फुकट सुद्धा!

काही चित्रपटांची तर नावं वाचून ओकारी नाही तर मिनिमम शिसारी कन्फर्म आहे उदा. 'खविस' आणि 'गोट्या गँगस्टर'. अहो खरंच...ह्या नावाचे चित्रपट आले होते. बायकोला काय विचारणार "वीकेंडला खविस बघायचा का?" २०२५ मध्ये मराठी सिनेमाने नातीगोती आणि भावनांचा बांध नाही तर धरणच फोडले. किती ते भावनाप्रधान आणि मेलोड्रामा चित्रपट. उत्तर, सावित्री कलियुगातली, प्रेमाची गोष्ट, वेल डन आई आणि असे बरेच काही. नट्यांच्या मानधनापेक्षा ग्लिसरीनचा खर्च जास्त. हे असले चित्रपट काढणे म्हणजे सुखशांती साठी केलेल्या होमात तूप टाकताना स्वतःच्या काखेतले केस जाळून घेण्यासारखं आहे.
मराठी चित्रपटसृष्टीचा अजून एक आवडता जॉनर म्हणजे 'पांचटपणा '. वडापाव, सुशीला सुजीत, चिकीचीकी बुमबुम असे एका पेक्षा एक झ दर्जाचे, पांचट विनोदाने बरबटलेले अनेक चित्रपट आले. नखं जशी कॅज्युअली वाढतात तसे हे लोक्स कॅज्युअली चित्रपट काढतात आणि तो चालावा अशी कर्मदळीद्री अपेक्षा पण ठेवतात.
ह्या सगळयात भर म्हणून 'बायोपिक'ने मांडलेला उच्छाद. अरे बाबांनो सोडा त्या थोर लोकांना, का घेता त्यांची सुपारी, काय घोडं मारलय तुमचं? सालाबादप्रमाणे मागच्या वृर्षीही तीन चार बायोपिक येऊन गेल्या. त्याविषयी लिहून मला त्या थोर लोकांच्या आत्म्याला परत त्रास द्यायचा नाहीये.



हे असले चित्रपट पाहून चिडचिड होते आणि वाटतं यांची शेवटची दृष्ट काढून तेच तांदूळ यांच्या तोंडात कोंबावेत. बर असं नाहीये की मराठीमध्ये टॅलेंटची कमी आहे. जारण, बोंबीलवाडी, दशावतार, फर्स्ट क्लास दाभाडे असे काही उत्तम चित्रपट ह्याच मराठी चित्रपटसृष्टीने दिले आणि मराठी रसिकप्रेक्षकांनी त्यांना डोक्यावर पण घेतले. मग, मला सांगा तुमच्या कडून मेरिटमध्ये येण्याची अपेक्षा ठेवणे चुकीचे आहे का? आम्हा सगळ्यांना मनापासून वाटते की मराठी चित्रपटसृष्टीची भरभराट व्हावी, माझ्या माय मराठीचा झेंडा सर्वदूर फडकावा. हे सगळं प्रेक्षकांना, चित्रपटगृह मालकांना किंवा सरकारला दोष देऊन साध्य होणार नाही. त्याकरिता प्राथमिक गरज आहे ती उत्तम कलाकृतीची आणि ही जबाबदारी आहे चित्रपटसृष्टीची. बघूया हे वर्ष कसे जातंय ते. नाहीतर आहेच ... 'ये रे माझ्या मागल्या'!

**अमित गाडगीळ**

# GKR and Associates, P.C.

## Tax and Accounting Firm

## Raj Grewal, CPA



**OUR SERVICES:**

- Tax and Accounting for individuals and small businesses

info@gkrcpa.com

734-658-8334

https://www.gkrcpa.com

Partner with us to create additional income and build wealth
We are expanding our team, call us to find out more!



*Best Wishes*

*from*

*Pradeep Kokate & Sharayu Dalvi*



# Youth in the heart of Our Mandal

My time as Youth President was shaped by a desire to make youth involvement feel intentional, and to learn how a community sustains itself across generations. Stepping into the role, my goal was simple: to help younger members feel that MMD was a space they genuinely belonged to, and to create structures that helped younger members feel ownership of the community. One of the initiatives I was most proud of piloting was the Youth Program Manager model, which gave students responsibility for planning and running individual programs. Instead of a small group doing everything, this approach encouraged leadership at many levels and helped younger volunteers gain confidence by seeing their ideas turn into real events.




Throughout the year, I worked with youth leaders to support both longstanding traditions and newer, youth-centered programs. Our new MMD Youth Workshop was a big hit, focusing on preparing our youth for the next step in their journey. At the same time, traditional community celebrations such as our annual Youth Sleepover, Ganapati, Diwali, and Sankrant remained central to our work. Helping coordinate youth involvement in these events offered a firsthand look at how cultural traditions are sustained through collective effort.

What stood out most to me was not any single event, but the shift in how younger members engaged with the Mandal. Students who initially showed up quietly began volunteering proactively, leading activities, and mentoring others. That sense of continuity—older youth stepping back while newer ones stepped forward—felt like the clearest measure of success.

Serving as Youth President taught me that leadership in a cultural organization is about creating pathways. Traditions endure when each generation is trusted to carry them forward in its own way, and my time at MMD reinforced the importance of building communities where responsibility, belonging, and cultural pride grow together.

**Pratyush Neelkanthan**

# Dr. Subhash Kelkar And Geetanjali Radio Program




## (Saturday 9am - 10am on WPON 1460 AM)







"तिळगूळ घ्या गोड बोला..."
मकर संक्रांत
निमित्त
सर्वांना
मंगलमय
शुभेच्छा..!
Best Wishes
from
Dr. Vimal Puri

# आजी आजोबा पारंपारिक की आधुनिक

आजी - आजोबा म्हणले की डोळ्यासमोर ६०, ७० वर्षाचे, नऊवारी साडी आणि धोतर जोडी तले हसरे छान चेहरे उभे राहतात. सदैव हसरे उत्साही, कंटाळा हा शब्द सुद्धा न उच्चारणारे, कुठले ना कुठले सतत काम करत असणारे असे हे व्यक्तिमत्व. सकाळी कुठे जायची गडबड नसताना सुद्धा लवकर उठणारे आणि पर्यायाने सर्वांना उठवणारे असे आजी-आजोबा. सकाळी उठल्यावर चा व्यायाम, मग चहा, आंघोळ आणि मग नाष्टा. मला आठवते, माझी आजी नेहमी म्हणायची सकाळी उठल्यावर पहिल्यांदा पारोसा केर काढायचा. आज-काल पारोसा काय, केर पण रोज काढला जात नाही, तेव्हा मला मात्र तिची कायम आठवण येते. दुपारचे जेवण झाल्यावर सुद्धा नुसती वामकुक्षी बर का, तासंतास झोपणे अजिबात नाही. जाग आल्यावर उगाचच काहीतरी काम काढून ते करत बसणे, जसे वाती वळणे ,धान्य निवडणे, भाजी निवडणे आणि जर का उन्हाळा असेल तर सगळे वाळवणाचे पदार्थ करणे, यातच सगळा त्यांचा उन्हाळी सुट्टीचा कार्यक्रम असायचा.



आज कालच्या मॉडर्न आजी मला वाळवणीचे पदार्थ करताना काय त्याचा विचार पण करताना दिसत नाहीत. त्यामुळे मुलांना पापड वगैरे पदार्थ कसे करायचे, हे कळणे जरा कठीणच आहे. संध्याकाळ झाल्यावर हातपाय तोंड धुवून देवाला नमस्कार करणे आणि मग शुभंकरोती मनाचे श्लोक रामरक्षा हनुमान स्तोत्र हे श्लोक म्हणणे, हे सगळ्या घराचे एक रुटीन होते. पण आज कल घरामध्ये श्लोक ऐकूच येत नाहीत कारण पूर्वीसारखे आजी-आजोबा राहिले आहेत का?

काळ बदलतो तसे आपल्या गरजा आपले विचार बदलत जाते पण आपले मूळ पण बदलणे गरजेचे आहे का? आज कालच्या घरांमध्ये पूर्वीसारखे आजी-आजोबा दिसत नाहीत, आजी आजोबा असतात पण ते लहान मुलांवर संस्कार करणारे, त्यांना वेगवेगळ्या गोष्टी सांगणारे, त्यांच्याकडून वेगवेगळ्या गोष्टी करून घेणारे आजी-आजोबा राहिले आहेत का? आजच्या नवीन बदलत्या आधुनिक जगामध्ये आजी-आजोबा सुद्धा बदलत चालले आहेत. आमच्या लहानपणी आम्हाला सगळे श्लोक रामरक्षा वगैरे आमच्या आजी-आजोबांनी शिकवले होते. आमच्यासोबत ते सुद्धा सगळे श्लोक म्हणायचे त्यामुळे आम्हाला ते वेगळे शिकवण्याची गरजच लागली नाही. आम्हाला ते एक आमच्या दिनचर्येतला एक भाग वाटत होते. श्लोक पाठांतर करण्यामागे धार्मिक कारण आहे तसेच शास्त्रीय कारणे सुद्धा आहेत जसे की बोलताना उच्चार स्पष्ट होणे, मेंदूची एकाग्रता वाढणे, पाठांतर होणे, इत्यादी. पण आजकाल you-tube वर नुसते बॅकग्राऊंडला श्लोक चालवून ते मुलांना पाठ होणार आहेत का? पूर्वी जसे आजी आजोबा लहान मुलांसाठी कायम उपस्थित असायचे तसे आजचे आजी-आजोबा कुठे असतात?



नवीन काळाच्या गरजेनुसार आई-वडिलांना मुलांवर संस्कार करायला तसा वेळ मिळत नाही मग ही जबाबदारी, खरंतर जबाबदारी नाहीच, तुमचे प्रेमच तुम्ही तुमच्या नातवंडांना जर दाखवलेत तर आम्ही जसे घडलो त्यात संस्कारात पुढची पिढी आपसूकच घडेल ना. पण आजकल आजी-आजोबांचे चित्र वेगळे दिसायला लागलेले आहे. आजच्या आजीआजोबांच्या तरुणपणी फेसबुक इंस्टाग्राम असे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म नसल्यामुळे त्यांना ते नवीन जग खुणावत आहे त्यामुळे ते त्यांच्या मूळ ध्येयापासून लांब जात आहेत.

आई वडील कामानिमित्त बाहेर असतात त्यामुळे जर आजी आजोबा घरी असतील मुलांसोबत आणि ते त्यांच्याशी गप्पागोष्टी करायचे सोडून जर फेसबुक इंस्टाग्राम असे पाहत राहिले तर नवीन पिढी आपले पूर्वीचे श्लोक, इसापनीतीच्या गोष्टी ज्या त्यांना नकळतपणे संस्कार शिकवतात त्या कुठे ऐकणार?

बदलत्या युगानुसार आपण सुद्धा नवीन टेक्नॉलॉजी नक्कीच शिकली पाहिजे पण त्यासाठी आपल्या महान अशा भारतीय संस्कृतीचा बळी देऊन नाही. आज कालच्या कोणत्याच मुलांना आपले राजे, त्यांच्या पराक्रमांच्या गोष्टी, पुराणातल्या रंजक गोष्टी असे काहीच माहिती नसते, पण त्यांना नवीन मोबाईल हाताळणे मात्र लगेचच येते यात आपली चूक नाही का?

अशा सगळ्या संस्कारात न वाढलेले मुल पुढे जाऊन जर आपल्यालाच प्रश्न विचारायला लागले, आपल्यापासून इमोशनली डिटॅच व्हायला लागली तर यात नक्कीच चूक कोणाची. ही सगळी जबाबदारी आजी-आजोबांचीच आहे असे नाही, आई-वडील सुद्धा तितकेच जबाबदार आहेत पण आज कालची गरज बघता आईला सुद्धा बाहेर पडावे लागते, तर ही जबाबदारी जर घरी असलेल्या आजी-आजोबांनी पार पाडली जे पूर्वीपासून होत आले आहे, तर येणारी पिढी नक्कीच पूर्वीच्याच पिढीसारखी संस्कारी बनेल त्यांना आपला धर्म, परंपरा वेगळ्या सांगण्याची गरज लागणार नाही.

कदाचित पूर्वीच्या आजी-आजोबांप्रमाणे आत्तासुद्धा मुलांबरोबर वेळ घालवायला चालू केले, तर कदाचित आजकाल जे नवीन मोबाईल एडिक्शन मुळे आजार निर्माण होत आहेत ते होणार नाहीत, कारण मुलांना त्यांचे कोणीतरी ऐकून घेणारे सतत आजूबाजूला असेल, त्यांच्यासोबत खेळायला आजी असेल, राजांच्या गोष्टी सांगायला , देवळात फिरायला घेऊन जायला आजोबा असतील. लहान मुलांचे सुद्धा मोबाईल स्क्रीन टाईम आपोआप कमी होईल आणि त्यांना आपला इतिहास सहजच माहित होईल आणि कदाचित एकत्र कुटुंब पद्धती पुन्हा आवडायला लागेल

*(Images are AI generated)*

**प्राची चितळे**



# Ode to the Volunteers of MMD

**(A Shakespearean Epic in Iambic Pentameter and Seven Scenes)**



### I. The Players and Their Roles

Attend, and hear a tale of Motown's grace,
Of special souls who dwell within this place
We are the strong and passionate of heart,
Who made the MMD vision true from the start
From Committee Leads to Volunteers so true,
And Board, and Executives, all join the crew!



Though leaders, we're also cooks and cleaners mean,
We are the hands that scour the vessels clean
As hosts we smile, as builders we construct,
Through crises unexpected, the path we instruct
This is the place where the rubber meets the street,
We are the ones who make the tasks complete!




### II. The Cause and The Bond

We labor for Marathi culture, and for our kin,
To keep the community spirit safe within
For old traditions and for the young we stand,
To pass the torch into the future's hand
And like a troop of soldiers, victorious and free,
We fight above all, for each another faithfully!



### III. The Campaigns of the Year

Come each event, we march unto the battle field,
With skirmishes that make the silence yield
Sankrant, Padwa, Picnic, Natak we play,
Ganesh Chaturthi, Kojagiri, and Diwali day
On phenomenal scale, by crowds' unseen,
At schools and auditoriums in our cities green!

**IV. The Council of War**

In weekly council, disciplined we meet,
To plan the schedule and the venue's seat
We argue topics large and small in scope,
Batata Wadas with Chaha? It is the members hope
We call on vendors and our sponsors true,
To bridge the gap and see the vision through
We juggle what the hopeful members crave,
Against the budget we must try to save!

**V. The Mobilization**

The teams awake as plans are set in stone,
By Marketing, the seeds of news are sown
Registration & Logistics prep, Decoration sets up lights,
Food, Stage & H&H prepare the feast and sights
Audio Visual play sounds with a careful ear,
And make sure that visuals are crystal clear
From morning's daybreak until the moon is high,
We labor hard beneath roof and open sky

**VI. The Aftermath and Victory**

Afterwards, come a flood of WhatsApp texts and calls,
The praise and complaints, we accept them all
Though weary in our bones, our hearts stay light,
We bear it all with calm and quiet might
The cycle turns, the months go flying past,
We plunge in again, with zeal built to last!


**VII. The Celebration**

This is the miracle we claim to be,
The volunteers of noble MMD
Not for the wreath of laurels do we serve,
But for the love that our group deserves
So, raise a glass to yourself, be proud and free,
As we march into the Golden Anniversary!













**By Uday Pathre**

Written for the MMD 2025 Volunteer Appreciation Party on 18th December 2025




Best Wishes from






# आठवणींच्या हिंदोळ्यात

महाराष्ट्र मंडळ ऑफ डेट्रॉईट लवकरच सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करणार आहे . या निमित्ताने, ज्यांनी हे मंडळ स्थापन केले, वाढवले, वृद्धिंगत केले अश्या अनेक सभासंदांची मुलाखत घेण्याचे या वर्षी स्नेहबंध समिती ने ठरवले आहे, "आठवणींच्या हिंदोळ्यात " या सदरातून . मंडळाच्या माजी अध्यक्षा **वर्षा पाथरे** यांनी आपल्या ज्येष्ठ सभासद " **प्रमिलाताई सरदेशपांडे** " यांची मुलाखत घेऊन या कार्याचा **"श्रीगणेशा"** केला आहे . मुलाखत वाचून आपला अभिप्राय जरूर द्या ..........

**१) प्रमिलाताई ,आपण भारतातून डेट्रॉईट परिसरात कधी आणि कोणत्या कारणासाठी स्थलांतर केले?**



मी १९७१ साली माझे पती श्री. मनोहर सरदेशपांडे यांच्यासोबत डेट्रॉईट, मिशिगन येथे आले. ते MMD चे संस्थापक सदस्यांपैकी एक होते आणि नंतर मंडळाचे पाचवे अध्यक्षही झाले.

**२) अमेरिकेत आल्यावर सुरुवातीच्या काळात कोणत्या अडचणी सर्वाधिक जाणवल्या?**

सुरुवातीच्या काळात सर्वात मोठी अडचण म्हणजे भारतीय धान्ये, तांदूळ आणि डाळी तसेच भाज्या सहज उपलब्ध नसणे. जवळपास भारतीय किराणा दुकान नव्हते. त्यामुळे आवश्यक वस्तू खरेदी करण्यासाठी आम्हाला शिकागो किंवा टोरांटोपर्यंत प्रवास करावा लागे.

**३) त्या काळात मराठी किंवा भारतीय समाजाकडून कसा आधार मिळाला?**

आम्ही येथे प्रथम आलो तेव्हा माझ्या पतींचे अमरावती येथील मित्र अशोक देशपांडे आणि रायपूर कॉलेजचे प्राध्यापक माधव वैद्य यांनी आम्हाला खूप मदत केली. बापू आणि मीना गोखले नवीन येणाऱ्यांना घरी बोलावून सर्वांशी ओळख करून देत असत. आम्ही आमच्या घरी गणपती उत्सव सुरू केला. लोक त्यांच्या आवडीनुसार पिकनिक, ब्रिज स्पर्धा आणि इतर कार्यक्रमांना उपस्थित राहत. जरी आम्हाला इंग्रजी भाषा येत होती, तरी अमेरिकन उच्चार आणि संदर्भ समजणे सुरुवातीला कठीण जात होते. येथे येण्यापूर्वी अमेरिकन संस्कृतीचा फारसा परिचय नव्हता.

**४) MMD संस्था स्थापन करण्यामागील मुख्य उद्देश काय होता? सुरुवातीच्या काळातील संस्थेच्या काही आठवणी किंवा अनुभव सांगाल का?**

MMD स्थापन करण्यामागील मुख्य उद्देश मराठी संस्कृती जपणे आणि परदेशातही घरासारखे वातावरण निर्माण करणे हा होता. त्या काळात सर्वांनाच आपल्या देशाची आणि कुटुंबाची खूप आठवण येत असे. फोन कॉल्स फारच क्वचित होत आणि भारतातून पत्र येण्याची आतुरतेने वाट पाहावी लागे. त्यामुळे अशा परिस्थितीत एकमेकांना भेटण्याचा, संवाद साधण्याचा आणि कुटुंबाप्रमाणे एकत्र येण्याचा एक निमित्त म्हणूनही मंडळाची स्थापना करण्यात आली.

सुरुवात गणपती उत्सवाने झाली आणि नंतर कोजागिरीसारखे कार्यक्रम साजरे केले जाऊ लागले. तसेच बापू आणि मीना ताई यांच्या घरी नियमितपणे घरगुती भेटी आयोजित केल्या जात. या भेटींमुळे सगळ्यांना एकत्र येण्याची, संवाद साधण्याची आणि आपुलकीची भावना जपण्याची उत्तम संधी मिळाली.

**५) गेल्या ४०–५० वर्षांत संस्थेमध्ये झालेले सर्वात मोठे बदल कोणते वाटतात?**

गेल्या काही दशकांत सभासदसंख्या खूप वाढली आहे. देशभरातून आणि जगभरातून विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. मदतीसाठी अधिक स्वयंसेवक उपलब्ध झाले आहेत. मराठी चित्रपटांचे प्रदर्शनही सुरू झाले.

मात्र, यासोबतच सभासदांच्या अपेक्षाही वाढल्या आहेत. सभासद शुल्क (membership fee) वाढत गेले तसे लोकांच्या अपेक्षाही अधिक वाढल्या आहेत. कार्यक्रमांचा दर्जा, व्यवस्था आणि सुविधा याबाबत आता अधिक अपेक्षा व्यक्त केल्या जातात.

**६) सांस्कृतिक कार्यक्रमांचे स्वरूप, नियोजन आणि सादरीकरण कसे बदलले आहे?**
सुरुवातीच्या काळात सभासद दरवर्षी फक्त $10 इतके शुल्क भरत असत. त्या निधीचा मोठा भाग कलाकारांना मानधन देण्यासाठी वापरला जात असे. त्या वेळी कार्यक्रम साधे पण मनापासून सादर केले जात. जेवण प्रामुख्याने घरीच बनवलेले असे. आज प्रत्येक कार्यकारिणीला कार्यक्रमांचे नियोजन करताना दर्जा आणि अर्थसंकल्प यांचा समतोल राखावा लागतो. कार्यक्रमांचे स्वरूप अधिक व्यावसायिक आणि व्यापक झाले आहे, तसेच सदस्यांच्या अपेक्षाही वाढल्या आहेत.

**७) कार्यक्रमांमधील जेवण, खाद्यसंस्कृती आणि एकत्र येण्याची पद्धत कशी बदलली आहे?**
सुरुवातीच्या काळात कार्यकारिणी सदस्य आणि स्वयंसेवक स्वतः सर्व जेवण बनवत असत. लोक स्वतःहून फोन करून एखादा पदार्थ बनवण्याची जबाबदारी घेत. मंडळ लहान होते आणि प्रत्येक जण आपल्या परीने योगदान करत असे.
जेवणाच्या नियोजनासाठी आम्ही कोणाच्या तरी घरी एकत्र जमून चर्चा करत असू. Food-Co-Ordinator ला फोन करून स्वयंसेवक एखादा पदार्थ बनवण्याची तयारी दर्शवत. त्यामुळे एकत्रितपणे काम करण्याची, आपुलकीची आणि सहकार्याची भावना अधिक दृढ होत असे. आज व्यवस्थापन अधिक सुटसुटीत आणि व्यावसायिक पद्धतीने केले जाते, पण त्या काळातील जिव्हाळा आणि सहभाग विशेष होता.

**८) नव्या पिढीचा मराठी भाषा व संस्कृतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा वाटतो?**
नवीन पिढीला मराठी भाषा पूर्णपणे समजत नाही. त्यामुळे त्यांना भाषा आणि संस्कृती समजावून सांगण्यासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. त्यांच्यावर काहीही लादू नये, तर संयमाने समजावून सांगून त्यांना जुळवून घेण्यास मदत करावी.
तसेच, नवीन मुले आपल्या संस्कृतीपासून लांब जाऊ नयेत यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यांना मराठी परंपरा, सण-उत्सव आणि मूल्ये यांची ओळख प्रेमाने करून दिली, तर ते नक्कीच आपल्या संस्कृतीशी जोडलेले राहतील.

**९) तंत्रज्ञानामुळे (सोशल मीडिया, ऑनलाइन कार्यक्रम) संस्थेवर काय परिणाम झाला असे आपल्याला वाटते?**
तंत्रज्ञानाचा एकूणच चांगला परिणाम झाला आहे. संवाद आणि कार्यक्रमांचे आयोजन अधिक सुलभ झाले आहे.

**१०) मराठी भाषा आणि संस्कृती जपण्यासाठी पुढील पिढीने काय करणे आवश्यक आहे?**
पुढील पिढीने बदलत्या काळाशी जुळवून घेत (Adaptation) मराठी भाषा आणि संस्कृती टिकवण्याचा प्रयत्न करावा.

**११) या संस्थेचे भवितव्य आपण कसे पाहता?**
संस्थेचे भवितव्य लोकांच्या आणि पुढील पिढीच्या एकजुटीवर अवलंबून आहे. सर्वांनी एकत्र राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विशेषतः नवीन आणि जुन्या पिढीमध्ये फूट पडू नये, याची काळजी घेतली पाहिजे. दोन्ही पिढ्यांनी एकमेकांना समजून घेत सहकार्य केले, तरच संस्था अधिक सक्षम आणि टिकाऊ बनेल

**१२) मंडळ आपल्याला किंवा आपल्या सारख्या अनेकांना कश्या प्रकारे मदत करून शकते?**
कार्यक्रम वेळेत, विशेषतः अंधार पडण्यापूर्वी संपवावेत. ज्येष्ठांसाठी ये-जा करण्याची व्यवस्था करावी. ज्येष्ठ सदस्यांना सक्रिय ठेवावे आणि पुढील पिढीला मार्गदर्शन देण्याच्या संधी द्याव्यात. तसेच नेतृत्वासाठी पर्यायी व्यवस्था (backup) तयार ठेवावी.
याशिवाय, आम्हालाही काही जबाबदाऱ्या किंवा कामे सोपवावीत, जेणेकरून आम्हाला सहभागाची आणि आपलेपणाची भावना वाटेल. लहान-सहान कामांमधूनही आम्ही मंडळाशी जोडलेले राहू शकतो आणि आम्हालाही आपण संस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहोत, असे जाणवेल.

**१३) आपल्या दीर्घ प्रवासातून मंडळासाठी एखादा संदेश किंवा सल्ला द्याल का?**
लोकांचा आदर करा. प्रत्येकाला त्यांच्या क्षमतेनुसार जबाबदारी द्या. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे समुदाय म्हणून एकजुटीने राहा.

# एक दुरावा...

एक दुरावा असा धरावा
प्रीतीच्या पायी
खळखळूनी प्रीत फुलावी
गंधीत होऊनी

राहुनी दूर देशी पण
वैर का धरावे
मन मोकळे करूनी आपण
का न सुखी व्हावे


इर्षा, मीपणात बुडूनी
का मनास दुखी करावे
समजूनी पण हे वळेना
जीवास का जळू द्यावे


राजन (निरंजन)
१० जानेवारी २०२६











This program is not sponsored by the Troy School District. Approval to distribute flyers is a community service and does not imply endorsement.




अंकिता कुलकर्णी




ग्रीशा वाकोडे





अन्वी आर्दाळकर




रिया दाभोळकर

# Canton Marathi Shala



आई आणि परदेशी जन्मलेली मुलगी

छोटी माझी चिमुकली, जन्मली परदेशात,
ठाऊक नव्हतं तुला, कशी बी मराठीची रुजावी मनात


समजत नव्हते तुला क, ख, ग आणि घ,
तरी म्हणे आई-बाबा, "मला मराठी कळते ग."

यावर्षी मराठी शाळेत घातले तुला,
हळव्या पावलांनी झाली मराठीची ओळख तुला

आता माझी चिंता मिटली, छान मराठी कळते तुला
तुझी नाळ आजोळशी जुळावी, हेच नेहमी वाटे मला.

सरिता संदीप आर्दाळकर
(अन्वी आर्दाळकरची आई)
कॅन्टन मराठी शाळा

**सरिता आर्दाळकर**
(अन्वी आर्दाळकरची आई)



||श्री||

तारीख-10/2/25
ठिकाण-अमेरिका

प्रिय आजी, आजोबा
सा. न. वि. वि

तुम्हा सर्वांना दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा. तुम्ही सगळे कसे आहात? आम्ही सगळे इकडे मजेत आहोत. यावेळी मी आकाशकंदिल बनवणार आहे. मी फटाके पण उडवणार आहे. मी छान छान फराळ खाणार आहे. मला तुमची खूप आठवण येते. पत्र मिळाले की फोन करा. परत एकदा दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा.

कळावे,
तुमची लाडकी नात
अन्वी

**अन्वी मोरे**




# Proud to Support Those Who Help So Many



HERITAGE
INSURANCE

With best compliments of Heritage Insurance Holdings, Inc. and *Vijay S. Walvekar*, a Co-Founder and Director.

heritagepci.com


855-536-2744




आरुष राव



अनया आदित्य कुलकर्णी



माझा आवडता सण

भारतात अनेक सण साजरे केले जातात, जसे होळी, गणपती, नवरात्री, दसरा. तसेच माझा आवडता सण दिवाळी आहे. दिवाळीला दुसरे नाव आहे दिपावली. भगवान राम वनवासातून घरी परतले त्या आनंदात हा सण केला जातो.

दिवाळी हा सण चार ते पाच दिवसांचा असतो. दिवाळीत आपण नवीन कपडे घालतो आणी फराळ खातो जसे चकली, चिवडा, व लाडू.

दिवाळीत मला फटाके उडवायला खूप आवडतं. मी घरी आकाशकंदील व भरपूर दिवे लावते. मला हा सण खूप आवडतो.

– अनन्या महाजन

अनन्या महाजन




आराध्या चव्हाण




मृण्मयी (ओवी) पांडे




प्रिषा परब



सई डफळापूरकर



शौर्य जोशी

# Troy Marathi Shala



श्राव्या मगदुम



स्वरा देशपांडे



4413 Reilly CT Troy 48085 • +1 (248) 719 - 4827 • rehabsensory1@gmail.com •


SENSORY REHABILITATION

# Bhushan Kulkarni & Family wishes you

GDi INFOTECH




Best Wishes from



FORTUNE FOREVER

FINANCIAL SERVICES






**ENDODONTIC ASSOCIATES** Farmington – West Bloomfield

Our office utilizes all the modern technologies and techniques. High-powered operating microscopes, digital radiography, and 3-D high resolution CBCT imaging to treat the most complicated cases for a positive patient experience with predictable outcomes integrated with advanced irrigation and bioceramics for a better healing.

- Conveniently located on Northwestern Highway just north of I-696
- Knowledgeable and compassionate endodontist to ensure clinical excellence
- Highly skilled staff to help provide the most excellent care for your patients
- Convenient parking , just a short walk to the clinic
- Flexible appointments to meet your patients' needs

**Hours of Operation: Monday – Friday 8:30am – 5:00pm | Happy to take your call! 248.737.1360**

**Dr. Amruta Mahajan** received her Bachelor of Dental Surgery from VSPM's Dental College and Research center, Nagpur, India and her certificate in Endodontics from UCLA School of Dentistry, Los Angeles, CA. She was also involved with teaching the second and fourth year dental students. She then worked as a research assistant in endodontics at the Forsyth Institute and Harvard School of Dental Medicine, Boston, MA. Dr. Mahajan then completed her residency in Endodontics from University of Pennsylvania School of Dental Medicine. Dr. Mahajan received the outstanding presenter award and teaching certificate for training general dentists and endodontists in micro-surgical techniques. She has lectured in Endodontics both locally and internationally with an interest in Micro-Surgery and vital pulp therapy. She has recently started up her own CE study clubs, if you are interested in joining please reach out to the office!




**It is our daily commitment to accommodate emergency cases immediately with the highest level of care as we are dedicated to serve as an *"extension of your practice"*.**

**www.rootcanalinfo.com**



महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट

एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ

महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट

एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ

## 2026

## MAHARASHTRA MANDAL OF DETROIT

# 49NotOut

## MEMBERSHIP

Student $60

Single $85

Single + Child $105

Single + 2 Children $125

Couple $150

Couple + 1 Child $170

Couple + 2 Children $190

Couple+ 3 Children $210

## INCLUDES

### PROGRAMS

(DISCOUNTED RATES FOR INDIA PROGRAMS)

SANKRANT
GUDI PADWA
PICNIC
GANPATI
KOJAGIRI
DIWALI

### EARLY DISCOUNTS ON


MOVIES
SELECTED SPECIAL EVENTS

### EDUCATIONAL & ENRICHMENT INITIATIVES

RASIKA, HEALTH & WELLNESS,
SPORTS DAY, SNEHABANDH,
COMMUNITY VOLUNTEERING
DHOL TASHA & MORE...

SCAN TO JOIN

LET'S PLAY


Best Wishes from
Gangadhar & Pushpa
Vaishampayan
Happy
Makar
Sankranti




From

# rasna

# foods

Avinash, Hema, Ruchi, Akash and Adarsh Rachmale



मकर संक्रांती
निमित्त आपणास व आपल्या परिवारास हार्दिक शुभेच्छा...!

The N. Rachmale Foundation

Prosperity Through Service
Avinash and Hema Rachmale

SKY Group Inc.
Sky Group Grand, LLC.
Real Estate Group

Lakeshore Healthcare Group LHG
Lakeshore Healthcare Group, Inc.
Nursing Home & Managed Care

Lakeshore Global
Lakeshore Global
Infrastructure Contractors

www.therachmalefoundation.org | www.Lgccorp.com

" आपले मंडळ "

|| Maharashtra Mandal of Detroit ||

Est. 1977



SCAN TO JOIN

Visit us on :

www.mmdet.org/membership